





## महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर

# सांस्कृतिक विभाग अहवाल २०२५–२६

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण–इस्लामपूर. सांस्कृतिक विभाग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देतो. यावर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**by Dr.Tejpal Jagtap**

| Sr. No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1. | Dr. N.S. Shinde | Principal |
| 2. | Dr. P. V. Gaikwad (Sr. Vice-Principal) | Member |
| 3. | Dr. S. S. Patil (Sr. Vice-Principal) | Member |
| 4. | Dr. T. T. Jagtap | Coordinator |
| 5. | Dr. S. K. Mane | IQAC Coordinator |
| 6. | Dr. S. N. Lad | IQAC Co-Coordinator |
| 7. | Dr. P. A. Ganganmale | Member |
| 8. | Dr. R. V. Dandge | Member |
| 9. | Dr. A. U. Mane | Member |
| 10. | Shri. N. M. Shinde | Member |
| 11. | Dr. S. P. Pardeshi | Member |
| 12. | Miss. T. S. Inamdar | Member |
| 13. | Miss. Bhuvaneshvari Patil | Member |
| 14. | Shri. D. A. Bichkar | Member |
| 15. | Shri. Jagannath Nangare | Member |
| 16. | Shri. Sunil Waje | Member |
| 17. | | Member |
| 18. | | Member |

Made with Gamma

## Indian Knowledge System & Cultural Department

**Organized Workshop on 05-08-2025**

## “Love Letter to Self”

## Resource Person: Hon. Ashwini Pratap Pawar







ग्र



# तरुण भारत

## निसर्गाच्या सानिध्यात समरस होता यावे

### अश्विनी पाटील : कर्मवीर महाविद्यालय येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**प्रतिनिधी**
इस्लामपूर

तरुणांनी निसर्गाच्या सानिध्यात जाऊन निसर्गाशी समरस होऊन निसर्गास तसेच स्वतःस कसे ओळखावे, झाडांशी कशा पद्धतीने बोलावे, निसर्गाचा जीवनामध्ये मनमुराद आस्वाद घ्यावा, त्यांच्याशी हितगुज करताना आपल्या अंतर्मनाचा आवाजही ऐकावा त्यातून ही सृष्टी सुंदर असल्याची प्रचीती येईल, असे मत अश्विनी प्रताप पवार यांनी व्यक्त केले.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज-मधील भारतीय ज्ञान परंपरा विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या एकदिवसीय कार्यशाळेत त्या बोलत होत्या. यावेळी कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड होते.

यावेळी महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या जनरल सचिव सरोज पाटील उपस्थित होत्या. भारतीय ज्ञान परंपरेतील सांख्य तत्वज्ञान त्याचबरोबर विविध नृत्य शैलीमध्ये त्या पारंगत आहेत. यावेळी कार्यशाळेत त्यांनी कला आणि निरीक्षण यांचे मर्म मांडले. थोडेसे ज्ञान, मनन, चिंतन याचा उपयोग करून स्वतःचा आत्मनिरीक्षणात्मक अनुभव पाहून विद्यार्थ्यांना स्वतःच पत्र लिहायला सांगितले आणि विद्यार्थ्यांपुढे स्वतःचेच एक नवीन जग उभे राहिले.

आज सामाजिक माध्यमावर व्यक्त होत असताना अनेकदा स्वतःचा आतला आवाज ऐकणे राहून गेले होते अशी प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी दिली.

स्वागत व प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. तेजपाल जगताप यांनी केले. डॉ. सीमा परदेशी यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य स्मिता पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. प्रमोद गंगनमाले यांनी केले.

इस्लामपूर : कर्मवीर महाविद्यालयामध्ये अश्विनी पाटील यांचा सत्कार करताना डॉ. व्ही. पी. गायकवाड.

सांगली, सोमवार, ११ ऑगस्ट २०२५ २

कार्यशाळेमध्ये सहभागी मान्यवर, प्राध्यापक व विद्यार्थी

आपल्या कॉलेजमधील ओंकार कुंडलिक जाधव याचा शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवासाठी जिल्हास्तरीय पासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत यशस्वी प्रवास .



संगीत



20th Maharashtra State Inter-University Youth Festival
7th - 11th November, 2024
Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola.

INDRADHANUSHYA 2024-25

*Certificate of Participation*

This is to certify that Mr./Mrs./Ms. *Jadhav Omkar Kundlik* from *Shivaji University, Kolhapur* has actively participated in "INDRADHANUSHYA 2024-25", organized by *Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola*.
He / She has participated in Procession Event at "INDRADHANUSHYA 2024-25".

Dr. S.S. Hadole, Student Welfare Officer
Dr. S. S. Mane, Dean(Agriculture) & Director of Instruction
Dr. S. R. Gadakh, Vice Chancellor

नाट्य



Ganpat University | Association of Indian Universities
AIU House, 16 Comrade Indrajit Gupta Marg (Kotla Marg), New Delhi 110002

No.ZM/Satrang-25-M-0336

Certificate of Merit

This is to certify that Jadhav Omkar Kundlik S/o, D/o Kundlik Jadhav representing Shivaji University won Forth position in Folk / Tribal Dance competition of the 38th AIU Inter-University West Zone Youth Festival (2024-25) hosted by Ganpat University, Mehsana (Gujarat) from 04th – 08th January 2025.

Mr. Kamlesh Patel, Organising Secretary, Satrang 2025
Dr. Mahendra Sharma, Pro Chancellor & Director General, Ganpat University
Dr. Mamta R. Agarwal, Association of Indian Universities (AIU), New Delhi
Dr. (Mrs.) Pankaj Mittal, Association of Indian Universities (AIU), New Delhi

नृत्य



दैनिक जनप्रवास बातम्यांच

थोडक्यात....

■ ओंकार जाधव याचा शिवाजी विद्यापीठाकडून कुलगुरू डॉ. शिर्के व मान्यवर यांच्याहस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

## शिवाजी विद्यापीठाकडून कभापाच्या ओंकार जाधव यांचा विशेष सत्कार

जनप्रवास । इस्लामपूर

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण-इस्लामपूर मधील बीएससी भाग ३ रसायनशास्त्र विभागाचा विद्यार्थी ओंकार कुंडलिक जाधव या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव ते राष्ट्रीय पातळीवरील विविध कार्यक्रमात सहभाग घेत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल शिवाजी विद्यापीठाकडून कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याहस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ओंकार जाधवने जिल्हास्तरीय युवामहोत्सव, मध्यवर्ती युवामहोत्सव, महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय युवामहोत्सव, भारतामधील विविध राज्यांमधील राष्ट्रीयस्तरावरील युवामहोत्सव या सर्वच गटांमध्ये, राष्ट्रीय पातळीवरील इंद्रधनुष्य या सांस्कृतिक महोत्सवांमध्ये सहभाग घेतला. लोकनृत्य, मूकनाट्य, फिल्म मेकिंग, एकपात्री अभिनय अशा विविध कला प्रकारामध्ये प्राविण्य संपादन केले आहे. सांस्कृतिकमधील विविध कलाप्रकारांत मिळवलेले यश वाखाणण्यासारखे आहे. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, सचिव सरोज पाटील, संस्थेचे पदाधिकारी आणि कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य, उपप्राचार्य आणि सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी ओंकार जाधवचे विशेष अभिनंदन केले. त्याला सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. तेजपाल जगताप यांचे मार्गदर्शन लाभले.

Made with Gamma

# आपल्या कॉलेजमध्ये ११ सप्टेंबर २०२५ रोजी शिवाजी विद्यापीठ सांगली जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन





- संगीत
- नाट्य
- नृत्य






Made with Gamma

# आपल्या कॉलेजमध्ये ११ सप्टेंबर २०२५ रोजी शिवाजी विद्यापीठ सांगली जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन






सकाळ TODAY सांगली, मंगळवार, ९ सप्टेंबर २०२५ ५

## इस्लामपूरमध्ये युवा महोत्सवाचा जल्लोष

### दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते गुरुवारी होणार उद्‌घाटन सोहळा

सकाळ वृत्तसेवा

**इस्लामपूर, ता. ८ : येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयामध्ये गुरुवारी (ता. ११) शिवाजी विद्यापीठ कक्षेतील ४५ व्या सांगली जिल्हास्तरावरील भव्य युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे. चित्रपटसृष्टीतील नावाजलेले दिग्दर्शक, कवी आणि संवेदनशील लेखक नागराज मंजुळे यांच्या हस्ते सकाळी ९.३० वाजता उद्‌घाटन होणार आहे.**

सरचिटणीस सरोजमाई पाटील अध्यक्षस्थानी आहेत. संस्थाध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष अभियंता सुनील पाटील, महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष संगीता पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर. डी. ढमकले, ॲड. एस. जी. पखळेकर, तासगावच्या पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. हुबरे, सांगली जिल्हा समन्वयक व विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. जाधव, शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे प्र. संचालक डॉ. टी. एम. चौगुले प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

संस्थेचे महात्मा फुले विद्यालय व कर्मवीर स्पर्धा परीक्षा प्रबोधिनीच्या परिसरात होत असून ... नाट्यगृहात एकांकिका स्पर्धा होणार आहेत.

महोत्सवात मूकनाट्य, लोकनृत्य, लोककला, एकांकिका, ... अभिनय, लघुनाटिका/प्रहसन, सुगम गायन, भारतीय समूहगीत, मराठी/हिंदी/इंग्रजीमध्ये वक्तृत्व, वादविवाद, पथनाट्य, प्रश्नमंजूषा आदी कलाप्रकारांचे सादरीकरण व त्यातील स्पर्धा असे एकूण ... कार्यक्रमाचे स्वरूप असणार आहे. संबंधित महाविद्यालयांनी बुधवारी ...

तरुण भारत संवाद सांगली पान ५

## हार-जीतचा विचार न करता लढत रहा

### नागराज मंजुळे : केबीपीमध्ये युवा महोत्सवाचे उद्‌घाटन : चुकीची कृती ही आयुष्यात उपयोगी ठरते

प्रतिनिधी
इस्लामपूर

तुमच्या सगळ्या चुकीची कृती पुढे आयुष्यात उपयोगी ठरतात. कोणत्या चुका पुन्हा करू नयेत, हे त्यातून समजते. त्यामुळे आपण सतत प्रयत्न करणे हाच जीवनाचा खरा अर्थ आहे. हार–जीत या स्पर्धेचा विचार न करता लढत राहिले पाहिजे, असे मत दिग्दर्शक, कवी, लेखक नागराज मंजुळे यांनी येथे केले.

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या शिवाजी विद्यापीठ कक्षेतील ४५ व्या सांगली जिल्हा स्तरावरील युवा महोत्सवाचे उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोजमाई पाटील या अध्यक्षस्थानी होत्या. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड.एन. आर. पाटील, उपाध्यक्ष अभियंता सुनील पाटील, महाविद्यालय विकास समितीच्या चेअरमन व मॅनेजमेंट कौन्सिलच्या सदस्या संगीता प्रशांत पाटील, शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे प्र.संचालक व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.आर.डी. ढमकले यांची प्रमुख उपस्थिती होती.

ते पुढे म्हणाले, सैराट या पहिल्या विलक्षण यशस्वी चित्रपटातून काय शिकायला हवे, याचे नकारात्मक मत अनेकांनी मांडले तरी सैराटमधील मुले प्रेमासाठी अकाली पळून जातात, तसे पळून जावू नये आणि आई–वडिलांनी आपल्या मुलांच्या चुकांची शिक्षा म्हणून तलवार काढून देवू नये, असेच यातून खरे सांगायचे आहे आणि हेच महत्त्वाचे होते.

सरोज पाटील म्हणाल्या, कला, संगीत, क्रीडा यांमधील नवनिर्मितीशीलता जपली व वाढवली पाहिजे. आजच्या स्पर्धेच्या युगात शिक्षक, पालकवर्ग यांपेक्षा मुलांना साचेबद्ध अभ्यासक्रमात व जीवघेण्या स्पर्धेत गुंतवून त्यांच्या क्षमता नष्ट करतात, हे होऊ नये याची आपण काळजी घेतली पाहिजे. म्हणूनच कुंडीतील झाड न बनता, माळरानातील हिरवे झाड झाले पाहिजे.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ.नितीन शिंदे यांनी केले. परिचय प्रा. एकनाथ पाटील यांनी करून दिला. यावेळी संगीता पाटील व प्रा.डॉ.टी.एम.चौगुले यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.तेजपाल जगताप यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ.प्रमोद गंगणमाले, डॉ.सीमा परदेशी यांनी केले. यावेळी मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य दिलीप पाटील, प्रशांत पाटील, प्रशांत वाजे, दीपक पाटील, स्मिता पाटील, डॉ.अनिल पाटील, विशाल पाटील यांच्यासह उपप्राचार्य डॉ.पी.व्ही.गायकवाड, डॉ.संदीप पाटील, ज्युनियरचे उपप्राचार्य प्रा.संतोष पाटील, प्रा. मिलिंद खंडेलोटे, अभिनेते संजय साठे, संजय चौधरी यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.



इस्लामपूर : येथे केबीपी महाविद्यालयातील युवा महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी दिग्दर्शक नागराज मंजुळे, व्यासपीठावर सरोज पाटील, ॲड. एन. आर. पाटील, सुनील पाटील आदी.

संगीत

नाट्य

नृत्य

Made with Gamma

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव, 2025

आपल्या कॉलेज मध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सहभाग.




1

"

पथनाट्य – पाचवा क्रमांक .

2

समुहगीत – तृतीय क्रमांक

3

सानिका वसंत लवटे

हिंदी वक्तृत्व – तृतीय क्रमांक



Made with Gamma

# मध्यवर्ती युवा महोत्सव, 2025

मिरज येथे झालेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभाग.

१. हिंदी वक्तृत्व (वैयक्तिक) - सानिका वसंत लवटे - तृतीय क्रमांक

२. व्यंगचित्र (वैयक्तिक) – आदित्य शंकर मस्के – चतुर्थ क्रमांक

३. भारतीय समूहगीत (सामुहिक) – चतुर्थ क्रमांक

४. शोभायात्रा (सामुहिक) – पंचम क्रमांक










th Gamma



## कर्मवीर महोत्सव

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण इस्लामपूर येथे दि. २० ते २२ जानेवारी २०२६ अखेर कर्मवीर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कर्मवीर महोत्सवाची सुरुवात शोभायात्रेने करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यापासून ते कॉलेजपर्यंत शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये महात्मा फुले शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच कॉलेजमधील प्राचार्य, सर्व स्टाफ आणि विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. विवध प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, सावित्रीबाई फुले, लक्ष्मीबाई पाटील तसेच विविध वेशभूषा करून सहभाग घेतला. यामध्येच संत परंपरेची ग्रंथदिंडी काढण्यात आली.

**शोभायात्रा आणि ग्रंथदिंडीमध्ये सहभागी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे पदाधिकारी व कॉलेजचे प्राचार्य तसेच विविध वेशभूषा करून सहभागी झालेला कॉलेज स्टाफ व विद्यार्थी**



महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण इस्लामपूर येथे गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी कर्मवीर महोत्सवामध्ये भारतीय ज्ञान परंपरा विभाग आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने शेला पागोटे कार्यक्रमाचे आयोजन  करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी खूप आनंदाने सहभाग घेतला. शेला पागोट्याचे वाचन प्रा. सुजाता चोपडे, प्रा. मनीषा पाटील आणि डॉ. राजेश दांडगे यांनी केले.




महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण इस्लामपूर येथे गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी कर्मवीर महोत्सवामध्ये भारतीय ज्ञान परंपरा विभाग आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध गुणदर्शन सोहळा व स्पर्धेचे आयोजन  करण्यात आले होते. प्रसिद्ध कलाकार आणि माजी विद्यार्थी म. फिरोज शेख हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. विद्यार्थ्यांनी विविध राज्यामधील नृत्य सादर केले.




या सर्व कार्यक्रमाकरिता संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे  सर, उपप्राचार्य डॉ.पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य मा. संतोष पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. तेजपाल जगताप आणि सांस्कृतिक विभागाचे सर्व सदस्य यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

Made with Gamma

जनप्रवास

# प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द सोडू नका : शेख

## कर्मवीर महोत्सवाची सांस्कृतिक कार्यक्रमाने सांगता



■ आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त प्रसिध्द सिनेअभिनेते आणि कॉलेजचे माजी विद्यार्थी फिरोज शेख बोलताना, समवेत कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे व इतर मान्यवर.

**जनप्रवास । ईश्वरपूर**

परिस्थिती कशीही असली तरी जिद्द सोडू नका. कलेप्रती असलेली निष्ठाच तुम्हाला यशाच्या शिखरावर नेऊ शकते. कॉलेजमध्ये होणारे हे सांस्कृतिक कार्यक्रम केवळ मनोरंजनासाठी नसून, ते उद्याचे कलाकार घडवण्याचे महत्त्वाचे केंद्र आहेत, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त प्रसिध्द सिनेअभिनेते आणि कॉलेजचेच माजी विद्यार्थी फिरोज शेख यांनी केले.

**कॉलेजच्या व्यासपीठाने बळ दिले**

अत्यंत प्रतिकूल कौटुंबिक, आर्थिक परिस्थिती मी अभिनयाचे स्वप्न पाहिले आणि ते सत्यात उतरवण्यासाठी याच कॉलेजच्या व्यासपीठाने मला बळ दिल्याचे शेख म्हणाले.

ते महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये तीन दिवस आयोजित केलेल्या कर्मवीर महोत्सवात बोलत होते. महोत्सवाची सांगता दिवसभर चाललेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने करण्यात आली. सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध गुणदर्शन सोहळा व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त प्रसिध्द सिनेअभिनेते आणि या कॉलेजचेच माजी विद्यार्थी फिरोज शेख उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन फिरोज शेख यांच्याहस्ते झाले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना फिरोज शेख म्हणाले, आज मी आंतरराष्ट्रीय स्तरावर वावरत असलो, तरी माझ्या अभिनयाची पहिली पायरी हे माझे कॉलेजच आहे. सांस्कृतिक विभागाच्या वतीने फिरोज शेख यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी विविध राज्यामधील नृत्य सादर केले. केवळ विद्यार्थीच नाही तर प्राध्यापकही या सादरीकरणात सहभागी झाले. यावेळी प्रा. स्मिता पाटील, माजी विद्यार्थी कलाकार आशिष कांबळे, माजी विद्यार्थी कलाकार ओंकार जाधव आदींनी केले. कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड व डॉ. संदीप पाटील, जुनिअर विभागाचे उपप्राचार्य संतोष पाटील, पर्यवेक्षक प्रा. मिलिंद खंडेलोटे, कार्याध्यक्ष डॉ. संदेश जिरगे, प्रा. एन. पी. टीबे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. तेजपाल जगताप, प्रा. आर. एम. पाटील यांच्यासह डॉ. प्रमोद गंगनमाले, डॉ. राजेश दांडगे, प्रा. सुजाता, चोपडे, प्रा. मनीषा पाटील, डॉ. एन. एम. शिंदे, जगन्नाथ नांगरे, प्रा. विश्वास सुतार, प्रा. पी. एच. पाटील, विद्यापीठ प्रतिनिधी सायली जाधव, प्रणव पाटील, ओम माळी आणि सांस्कृतिक विभागाचे सर्व सदस्यांनी या सर्व सोहळ्याचे यशस्वी संयोजन केले.

---

तरुण भारत संवाद

# कर्मवीर महोत्सवाची विविध उपक्रमांनी सांगता

**वार्ताहर**
**इस्लामपूर**

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये तीन दिवस आयोजित कर्मवीर महोत्सवाची सांगता करण्यात आली. यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त प्रसिद्ध सिनेअभिनेते व माजी विद्यार्थी फिरोज शेख उपस्थित होते. उद्‌घाटन फिरोज शेख यांच्या हस्ते झाले.

फिरोज शेख म्हणाले, आज मी आंतरराष्ट्रीय स्तरावर वावरत असलो, तरी माझ्या अभिनयाची पहिली पायरी हे माझे कॉलेजच आहे. मी अभिनयाचे स्वप्न पाहिले आणि ते सत्यात उतरवण्यासाठी याच कॉलेजने बळ दिले. यावेळी फिरोज शेख यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



ईश्वरपूर : आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त प्रसिद्ध सिनेअभिनेते व माजी विद्यार्थी फिरोज शेख यांच्यासमवेत प्राचार्य डॉ. नितीन शिंदे व इतर मान्यवर.

यावेळी विद्यार्थ्यांनी गायन, वादन, नृत्य, नाटिका यांसारख्या विविध कलागुणांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी विविध राज्यामधील नृत्य सादर केले. आदिवासी नृत्य, लावणी, कोळीनृत्य, गोंधळ, दक्षिण भारतीय नृत्य आणि बॉलीवूड गाणी सादर केली. परीक्षण संस्थेच्या प्रा. स्मिता पाटील, आशिष कांबळे, ओंकार जाधव आदींनी केले. प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड व डॉ. संदीप पाटील, उपप्राचार्य संतोष पाटील, पर्यवेक्षक प्रा. मिलिंद खंडेलोटे, कार्याध्यक्ष डॉ. संदेश जिरगे, प्रा. एन. पी. टीबे, डॉ. तेजपाल जगताप, प्रा. आर. एम. पाटील यांच्यासह डॉ. प्रमोद गंगनमाले, डॉ. राजेश दांडगे, प्रा. सुजाता, चोपडे, प्रा. मनीषा पाटील डॉ. एन. एम. शिंदे, जगन्नाथ नांगरे, प्रा. विश्वास सुतार, प्रा. पी. एच. पाटील, विद्यापीठ प्रतिनिधी सायली जाधव, प्रणव पाटील, ओम माळी आणि सर्व सदस्य यांनी याचे नियोजन केले.

सांगली । ■ शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६

---

सकाळ

# कर्मवीर भाऊराव महाविद्यालयात तीनदिवसीय सांस्कृतिक कार्यक्रम

■ **सकाळ वृत्तसेवा**

ईश्वरपूर, ता. २७ : ''परिस्थिती कशीही असली तरी विद्यार्थ्यांनी जिद्द सोडू नये. कलेप्रती असलेली निष्ठाच तुम्हाला यशाच्या शिखरावर नेऊ शकते,'' असे मत अभिनेते फिरोज शेख यांनी व्यक्त केले. येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये तीन दिवस आयोजित कर्मवीर महोत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रमात ते बोलत होते. सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध गुणदर्शन सोहळा व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त प्रसिद्ध अभिनेते आणि या कॉलेजचेच माजी विद्यार्थी फिरोज शेख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शेख यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले.

शेख म्हणाले, ''आज आंतरराष्ट्रीय स्तरावर वावरत असलो, तरी अभिनयाची पहिली पायरी कॉलेजच आहे. प्रतिकूल कौटुंबिक आणि आर्थिक परिस्थिती असतानाही अभिनयाचे स्वप्न पाहिले. ते सत्यात उतरवण्यासाठी याच कॉलेजच्या व्यासपीठाने बळ दिले.''



ईश्वरपूर : कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना सिनेअभिनेते फिरोज शेख.

ते म्हणाले, ''कॉलेजमध्ये होणारे हे सांस्कृतिक कार्यक्रम मनोरंजनासाठी नसून, ते उद्याचे कलाकार घडवण्याचे महत्त्वाचे केंद्र आहे.'' सांस्कृतिक विभागाच्या वतीने शेख यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

विविध स्पर्धांमधील विजेत्यांना शेख व मान्यवरांच्या यांच्या हस्ते गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी गायन, वादन, नृत्य, नाटिका अशा विविध कलागुणांचे सादरीकरण केले. कॉलेजमधील ३० पेक्षा अधिक कला प्रकारांचे सादरीकरण केले, ज्यात आदिवासी नृत्य, लावणी, कोळीनृत्य, गोंधळ, दक्षिण भारतीय नृत्य आणि बॉलीवूड गाणी सादर केली गेली. वेशभूषा व कलाप्रकारांचे परीक्षण संस्थेच्या सदस्य प्रा. स्मिता पाटील, माजी विद्यार्थी कलाकार आशिष कांबळे, ओंकार जाधव यांनी केले. प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड व डॉ. संदीप पाटील, ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य संतोष पाटील, पर्यवेक्षक प्रा. मिलिंद खंडेलोटे, कार्याध्यक्ष डॉ. संदेश जिरगे, प्रा. एन. पी. टीबे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. तेजपाल जगताप, प्रा. आर. एम. पाटील, डॉ. प्रमोद गंगनमाले, डॉ. राजेश दांडगे, प्रा. सुजाता, चोपडे, प्रा. मनीषा पाटील डॉ. एन. एम. शिंदे, जगन्नाथ नांगरे, प्रा. विश्वास सुतार, प्रा. पी. एच. पाटील, विद्यापीठ प्रतिनिधी सायली जाधव, प्रणव पाटील, ओम माळी यांनी संयोजन केले.

Sangli, Sangli-Today
28/01/2026 Page No. 2

Made with Gamma

14 फेब्रुवारी 2026 रोजी **Valentine Day** च्या निमित्ताने सांस्कृतिक विभाग, विवेकवाहिनी आणि नातं रक्ताच परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने “प्रेमाचा कट्टा” या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. प्रमुख अतिथि म्हणून रोहित दळवी उपस्थित होते.










महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर सांस्कृतिक विभाग

# Future Plan

सांस्कृतिक

१. विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक बाबींविषयी अधिक रुची निर्माण करणे.

२. कार्यशाळा घेऊन विद्यार्थ्यांना सर्व कलाप्रकारांविषयी माहिती देणे.

३. सांस्कृतिक विभाग अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न करणे.

४. पुढील शैक्षणिक वर्षांमध्ये अधिक यश मिळविणे.

Thank You

Made with Gamma